<u>रे मु नं. १७३ /२०१६ मधील निशाणी ३० वर आदेश</u>

१ प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज कोर्ट कमिशनर नेमणूकीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे थोडक्यात कथन अस की वादीने दावा मिळकतीचे क्षेत्र २४ फूट ११ फूट असे नमुद केले आहे. तथापि प्रत्यक्षात सदरचे क्षेत्र १२ फूट ११ फूट असे आहे. सदरची खरी वस्तू स्थिती समोर येणेकरिता कोर्ट कमिशनरचे नियुक्ती करणे आवश्यक आहे.

२ सदर अर्जात वादीने नि. ३४ वर म्हणणे दाखल करुन सदर अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की प्रतिवादींनी सदरचा अर्ज पुरावा गोळा करण्याच्या हेतूने दिलेला आहे. तसेच सदर अर्ज दाखल करणेकरिता योग्य ती कारणे दाखल केलेली नाही.

३ वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. एक बाब निर्विवाद आहे की वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे. तथापि ताब्यात असलेल्या क्षेत्राबाबत वाद आहे. दिवाणी प्रकिया संहिता ऑ. २६ रुल ९ चे अवलोकन केले असता कोर्ट कमिशनरची नेमणूक उभयपक्षांच्या वादातील मिळकतीच्या क्षेत्राच्या स्पष्टीकरणाकरिता करता येईल. सदर कामी वाद हा क्षेत्राबाबत असल्याने कोर्ट कमिशनरची नेमणूक केल्यास खरी परिस्थिती समोर येणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मजुंर केल्यास न्यायदानास मदत होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मजुंर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

—: **<u>आदेश</u>** :—

१ ॲड. श्री एस. एन कामत यांची दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर म्हणुन नियुक्ती करण्यात येते.

२ ॲड. कामत यांनी वादी व प्रतिवादींना आगाउ नोटीस देवुन भेटीची तारीव व वेळ कळवावी व ग्रामपंचायत मिळकत क्रं १११३ मधील वादी यांचे ताबेमध्ये असलेल्या दुकान गाळयाची लांबी व रुंदी मोजून आजुबाजुची वस्तुस्थितीचा आलेख तयार करावा.

३ जरुर भासल्यास ॲड कामत यांनी मिळकतींच्या खात्रीकरीता ग्रामसेवक, केडगांव यांची मदत घ्यावी.

४ प्रतिवादीने कोर्ट कमिशन फि रक्कम ३०००/— ॲड. कामत यांना हाती दयावे.

५ वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी कोर्ट कमिशनर यांना दाव्याची योग्य ती सर्व कागदपत्रे पुरवावी.

६. कोर्ट कमिशनर ॲड. श्री. कामत यांनी आपला अहवाल सर्व कागदपत्रांसह दि. ३.०९.२०१६ रोजी सादर करावा.

दि. १०.०८.२०१६

(श्री. पी. जी. लंबे)

**३ रे सह. दिवणी न्यायाधिश क. स्तर दौंड**